# दत्तगीता

लेखक

**स्वामी दत्तावधूत**

**ॐ वनिता बुक्स**
मुंबई – ४०० ०१२

☯ **ॐ वनिता बुक्स**

प्रथमावृत्ती : २००२

द्वितियावृत्ती : २०११

तृतीयावृत्ती : २०१७

☯ **पुष्प १० वे**

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

©

☯ **मूल्य : रु. ४५/-**

☯ **प्रकाशक**

**ॐ वनिता बुक्स**

बी २१३, सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था

डॉ. एस्. एस्. राव मार्ग, लालबाग, मुंबई – ४०० ०१२.

दूरध्वनी : ०२२ –२४१८७३३९

भरो शांतीने विश्व ।

व्हावे आध्यात्मिक विश्व ।

भक्ती, ज्ञान, प्रेमयुक्त ।

व्हावे अखिल विश्व हे ।।

।। श्रीस्वामी दत्तावधूत ।।

# ।। प्रथमोऽध्यायः ।।

**श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः ।**

**।। श्रीगुरुभ्यो नमः ।।**

।। ॐ द्राम् दत्तात्रेयाय नमः।।

**कैलासशिखरे रम्ये नानारत्नोपशोभिते ।**
**नानावृक्षलताकीर्णे कुसुममोदमनोहरे ।। १ ।।**

कैलास पर्वताचे रम्य, मनोहर शिखर शोभून दिसत होते. विविध रत्नांनी तेथील भूमि शोभिवंत दिसत होती. वृक्ष, लता, वेलींनी तसेच उमललेल्या कमलपुष्पांनी तेथील आसमंत बहरून गेला होता. वातावरण अत्यंत शांत व प्रसन्न होते. ।। १ ।।

**यक्ष चारण गंधर्व देवदेवी समन्वितम् ।**
**प्रशांतचित्तं महादेवं वसन्तं तत्र पर्वते ।। २ ।।**

अशा त्या प्रसन्न वातावरणात प्रसन्न वदन महादेव शांत चित्ताने बसले होते. देव-देवता, यक्ष, चारण, गंधर्व त्यांच्या सभोवार बसलेले होते. ।। २ ।।

**प्रसन्नवदनं वीक्ष्य लोकानां हितकाम्यया ।**
**प्रणम्य पार्वती देवी शंकरं परिपृच्छति ।। ३ ।।**

असे हे सर्व आनंदमय, प्रसन्न वातावरण पाहून जगत्कल्याणार्थ पार्वतीने भगवान् शंकरांना वंदन करून विनीत स्वरात विचारले. ।। ३ ।।

**श्रीपार्वत्युवाच**

**देव देव महादेव ।**
**मन्नाथ करुणानिधे ।**
**भक्तकामकल्पद्रुम ।**
**निरस्य मम संशयम् ।। ४ ।।**

पार्वती देवी म्हणाली, हे नाथ ! हे करुणानिधे ! हे महादेवा, कल्पवृक्षाप्रमाणे आपण भक्तांचे मनोरथ पूर्ण करता. माझ्या मनांतील एका शंकेचे आपण निरसन करावे. ।। ४ ।।

**अस्मिन् कलियुगे घोरे ।**
**जीवाश्चासुरतां गताः ।**
**दैवी स्वभाव प्राप्त्यर्थं ।**
**किं कर्तव्यं परायणम् ।। ५ ।।**

संपूर्ण जगावर घोर कलियुगाचे साम्राज्य सुरू आहे, मनुष्य आसुरी प्रवृत्तींनी वागत आहे, सर्वत्र दुष्ट प्रवृत्तींची प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे, अशा या घोर कलियुगात दैवी प्रवृत्ती, दैवी स्वभाव अथवा सद्गुण प्राप्त होण्यासाठी कोणती उपासना करावी? ।। ५ ।।

**साधनं कथय श्रेष्ठं पावनानां च पावनम् ।**
**मोक्षप्राप्तिकरं शाश्वत् साधनं सुलभं परम् ।। ६ ।।**

असे काही अत्यंत श्रेष्ठ असे साधन सांगा की, जेणेकरून मनुष्य जीवांना मोक्षप्राप्ति सुलभ होईल. ते साधन असे असावे की, ज्याने पतित पावन होतील, तर पावन ज्ञानी होऊन मोक्ष पदाला जातील. ।। ६ ।।

**इतीदं वचनं श्रृत्वा ।**
**शंकरो लोकशंकरः ।**
**पार्वतीं कथयामास ।**
**महाकारुण्यवारिधिः ।। ७ ।।**

महादेवी पार्वतीचे हे अशा प्रकारचे वचन ऐकून सर्व जगाचे कल्याण करणारे, कारुण्याचे सागर भगवान् शंकर म्हणाले; ।। ७ ।।

**श्रीशिव उवाच**

**धन्यासि त्वं महादेवि ।**
**लोकानां हितकारिणि ।**
**भद्रे सत्यं त्वया उत्क्तं ।**
**कथयामि यथार्थतः ।। ८ ।।**

श्रीशिव म्हणाले... हे देवी ! तू धन्य आहेस. तुझा हा प्रश्न सर्व विश्वाचे कल्याण करणारा आहे. नि:संशय लोककल्याणासाठी तू हा प्रश्न विचारलेला आहेस. तेव्हा मी तुला सविस्तर सांगतो. ।। ८ ।।

**सत्यं सत्यं पुनः सत्यं सत्यं सत्यं वरानने ।**
**दत्तात्रेयस्य मंत्रस्य “द्रां प्रणवपूर्वकम्” ।**
**अहर्निशं जपात्सद्यः सद्गतिं प्राप्नुयान्नरः ।। ९ ।।**

हे वरानने माझे हे सत्यवचन ऐक. “ॐ द्रां दत्तात्रेयाय नमः” या नाम मंत्राने सद्गती प्राप्त होते, हे त्रिवार सत्य आहे. ।। ९ ।।

**सोऽहं ध्याने ब्रह्मरन्ध्रे ।**
**ज्योतिरूपं प्रकाश्यते ।**
**साक्षात्कारः स एव स्यात् ।**
**दत्तात्रेयस्य मुक्तिदः ।। १० ।।**

सोऽहं ध्यानाने ब्रह्मरन्ध्रात अर्थात दशमद्वारामध्ये अत्यंत तेजस्वी ज्योतिरूप श्रीदत्तात्रेयांचा साक्षात्कार होतो. तोच खरा मुक्ती देणारा (सर्व संसारपाशातून मुक्त करणारा) स्वरूप साक्षात्कार होय. ।। १० ।।

**दत्तात्रेयोऽवधूतो ।**
**वसते सह्यपर्वते ।**
**तस्य स्मरणमात्रेण ।**
**नष्टं स्यात् कलिकल्मषम् ।। ११ ।।**

भगवान् अवधूत दत्तात्रेय सह्याद्री पर्वतावर राहतात. त्यांच्या स्मरणानेच सर्व प्रकारचे कलीमल नष्ट होऊन जातात. ।। ११ ।।

**कलौ श्रीदत्तमंत्रः सिद्धस्तूर्णं फलप्रदः ।**
**शस्तं कर्मसु सर्वेषु जप यज्ञ क्रियादिषु ।। १२ ।।**

कलियुगामध्ये श्रीदत्तमंत्र अत्यंत त्वरित फळ देणारे आहेत. यामुळे जप, तप, यज्ञ इत्यादि सर्व क्रियांमध्ये याच मंत्रांचा वापर करावा. ।। १२ ।।

**अवधूतो निरंजनो दत्तः ।**
**सत्योऽद्वैत परात्परः ।**
**स्वयं प्रकाशः पूर्णश्च ।**
**सच्चिदानंदविग्रहः ।। १३ ।।**

अवधूत निरंजन दत्त हे सत्य, अद्वैत, परात्पर, स्वयंप्रकाशमान आणि सदोदित पूर्ण असे सच्चिदानंद परमेश्वराचे रूप आहे. ।। १३ ।।

**निर्विकारो निराधारो ।**
**निर्विशेषो निराकुलः।**
**गुणातीतः सर्वसाक्षी ।**
**जगत् कारण कारणः ।। १४ ।।**

हे पार्वती ! जो निर्विकार आहे, ज्याला कोणत्याही आधाराची आवश्यकता नाही, ज्याला कुळगोत्र नाही, असा तो त्रिगुणातीत, सर्वसाक्षी भगवान् दत्तात्रेय विश्वाचे आदिकारण आहे. ।। १४ ।।

**श्रीदत्तः सर्वभूतेषु ।**
**सर्वव्यापी सनातनः ।**
**सर्वेन्द्रियगुणाभासः ।**
**सर्वेन्द्रियविवर्जितः ।। १५ ।।**

हे देवी! भगवान् दत्तात्रेयांचे स्वरूप असे आहे की, म्हटले तर ते साकार आहेत, म्हणजेच ते साध्या चर्मचक्षूंनाही दिसतात. इतकेच नव्हे तर ते सकल सद्गुणांनी मंडित आहेत. परंतु ज्ञानदृष्टीने पाहू जाता भगवान् दत्तात्रेय हे सर्वव्यापी, सनातन असे तत्त्व असून परमेश्वराचे चराचर हेच रूप असून ते निराकार व निर्गुण आहेत. ।। १५ ।।

**लोकातीतो लोकहेतु ।**
**र्वाङ्मनोभ्यामगोचरः ।**
**स वेत्ति विश्वं सर्वज्ञस्तं ।**
**न जानाति कश्चनः ।। १६ ।।**

हे देवी ! भगवान् दत्तात्रेय हे अनंतकोटी ब्रह्माण्डाच्याही पलीकडे आहेत आणि म्हणूनच वाणी आणि मन यांना ते अगोचर आहेत. ते सर्व विश्व जाणतात, परंतु त्यांना कोणीच जाणू शकत नाही. ।।१६।।

**दत्ताधीनमिदं सर्वं ।**
**त्रैलोक्यं सचराचरम् ।**
**तस्येच्छया च ब्रह्माण्डे ।**
**जातोऽहं तु महेश्वरः ।। १७ ।।**

हे महेश्वरी ! त्या भगवान् दत्तात्रेयांच्या अधीन हे सर्व विश्व, त्रैलोक्य, चराचर ब्रह्माण्ड आहे. केवळ त्यांच्या इच्छेनेच माझी उत्पत्ति झाली आहे. ।। १७ ।।

**कारणं सर्व भूतानां ।**
**श्रीदत्तः परमेश्वरः ।**
**आब्रह्मस्तंभपर्यंतं ।**
**तन्मयं सकलं जगत् ।। १८ ।।**

हे देवी ! या विश्वातील सर्व प्राणीमात्रांचे भगवान् दत्तात्रेय हेच कारण असून ब्रह्मदेवापासून गवताच्या काडीपर्यंत सारे काही त्यांचीच निर्मिती आहे. इतकेच नव्हे तर, हे सर्व विश्व श्रीदत्तमय आहे. ।। १८ ।।

**यथाऽभिषेके तरोर्मूले ।**
**तृप्त्यंते वृक्षपल्लवाः ।**
**श्रीगुरुदत्तोपासनेन ।**
**तृप्त्यंति सर्वदेवताः ॥ १९ ॥**

ज्याप्रमाणे वृक्षाच्या मुळाला पाणी घातले असता शाखा, पाने संतुष्ट होतात, त्याप्रमाणे भगवान् दत्तात्रेयांच्या उपासनेने सर्व देवता तृप्त होतात. ॥ १९ ॥

**॥ इति श्रीदत्तगीता ईश्वर-पार्वती संवादे ॥**
**॥ प्रथमोऽध्यायः ॥**

## ।। द्वितीयोऽध्यायः ।।

**श्री पार्वत्युवाच –**

**देवदेव महादेव ।**
**देवतानां जगद्गुरुः।**
**वक्ता त्वं सर्वशास्त्राणां ।**
**मन्त्राणां सर्व साधनम् ।। १ ।।**

पार्वती देवी म्हणाली, हे देवा! हे महादेवा! सर्व देवतांनाही जगद्गुरु असणाऱ्या हे सच्चिद्घना! आपण सर्व शास्त्रांचे वक्ते आहात. सर्व मंत्र ही आपलीच निर्मिती आहे. ।। १ ।।

**कथितं त्वया श्रीदत्तः ।**
**परब्रह्मपरात्परम् ।**
**यस्योपासनतो जीवो ।**
**भुक्तिं मुक्तिं च विन्दति ।। २ ।।**

आपण म्हणाला होतात की, श्रीदत्त हे परात्पर, परब्रह्म आहेत. त्यांच्या उपासनेने भोग व मोक्ष या दोन्ही गोष्टींची प्राप्ती होते. ।। २ ।।

**केनोपायेन भगवन् ।**
**श्रीगुरुदत्तः प्रसीदति ।**
**किं साधनं को मंत्रो वा ।**
**कृपां तस्य तु साधयेत् ।। ३ ।।**

म्हणून कृपया, हे भगवान् ! मला हे सांगा की, भगवान् दत्तात्रेयांना प्रसन्न करण्याचा मार्ग कोणता ? त्यासाठी कोणती साधना करावी लागते किंवा कोणत्या मंत्राचे अनुष्ठान करावे लागते ? ।। ३ ।।

**किं ध्यानं किं विधानं च ।**
**परेशस्य महात्मनः ।**
**तत्त्वत्तः श्रोतुमिच्छामि ।**
**कृपया कथय प्रभो ।। ४ ।।**

ध्यान कोणते ? ते कसे करावे? कोणत्या विधानाने त्या परमेश्वराचे ध्यान करावे? हे भगवान् ! कृपा करून मला सविस्तर सांगा. ।। ४ ।।

**श्रीशिव उवाच**

**अतिगुह्यं परं तत्त्वं ।**
**श्रृणु मत्प्राणवल्लभे ।**
**रहस्यमेतत्कल्याणि ।**
**न कुत्रापि प्रकाशितम् ।। ५ ।।**

श्रीसदाशिव म्हणाले ... हे प्राणप्रिये ! अत्यंत गुह्य व गुप्त असे हे तत्त्वसाधन मी तुला सांगत आहे. हे रहस्य मी आजपर्यंत कोणालाच सांगितले नव्हते. ।। ५ ।।

**तव स्नेहेन वक्ष्यामि ।**
**मम प्राणाधिकं परम् ।**
**ज्ञेयं भवति तद्ब्रह्म ।**
**सच्चिद्विश्वमयं परम् ।। ६ ।।**

हे पार्वती तुझ्यावरील माझ्या स्नेहामुळे प्रथमच माझ्या अंतरंगातील अत्यंत गुप्त विषय मला माझ्या प्राणाहून अधिक प्रिय असल्याने आजतागायत मी कोणालाच हे रहस्य सांगितले नव्हते. कारण या रहस्याद्वारे सच्चिदानंदमय परब्रह्म, जगदात्मा यांचे ज्ञान होते. ।। ६ ।।

**तत्साधनं प्रवक्ष्यामि ।**
**श्रृणुष्व अवहिता प्रिये ।। ७ ।।**

आता या परब्रह्म, भगवान् दत्तात्रेयांची साधना कशी करावी ते ऐक. ।। ७ ।।

**ॐ अवधूत निरंजन दत्त ।। ८ ।।**
**ॐ द्रां ॐ ।। ९ ।।**
**सर्व मन्त्रोत्तमः साक्षात् ।**
**धर्मार्थकाममोक्षदः ।**
**सर्व सिद्धीकरं देवि ।**
**सर्व सौभाग्यदायकम् ।। १० ।।**

सर्व मंत्रांमध्ये वरील मंत्रांची साधना सर्वोत्तम आहे. पहिला मंत्र निष्काम साधक व ज्या साधकांना श्रीदत्त या परमेश्वराला जाणून घ्यावयाचे आहे, अशांसाठी आहे. तर दुसरा मंत्र हा सकाम भक्तांसाठी आहे. या साधनेने सर्व सिद्धि, धर्म, अर्थ, काम, मोक्ष प्राप्त होतात. सर्व सौभाग्यकारक, परममंगल अशी ही साधना आहे. ।। १० ।।

**श्रुणु देवि प्रवक्ष्यामि ।**
**सत्यं सत्यं मयोच्यते ।**
**श्रीगुरुदत्तो भक्तानां ।**
**किमन्यस्य प्रयोजनम् ।। ११ ।।**

देवी ! मी तुला पुन्हा पुन्हा सत्य सांगत आहे की, श्रीदत्तभक्तांना अन्य कोणत्याही साधनांची आवश्यकता नाही. ।। ११ ।।

**।। इति श्रीदत्तगीता द्वितीयोऽध्यायः ।।**

## ।। तृतीयोऽध्यायः ।।

**श्रृत्वा निरंजनं दत्तं परब्रह्म परायणम् ।**
**परमानन्दसम्पन्ना शंकरं परिपृच्छति ।। १ ।।**

श्रीदत्त परब्रह्माची उपासना व महिमा ऐकून परमानंदित झालेली महादेवी भगवान् शंकरांना विचारती झाली. ।। १ ।।

**श्रीमहादेव्युवाच –**

**मम प्रीतिकरं देव लोकानां हितकारकम् ।**
**सविशेषं सविधानं साधनं कथय प्रभो ।। २ ।।**

पार्वती म्हणाली.... हे प्रभो ! हे माझ्या प्राणप्रिय देवा ! सर्व लोकांच्या कल्याणासाठी या उपासनेचे मर्म संपूर्णपणे सांगण्याची कृपा करावी. ।। २ ।।

**श्रीशिव उवाच –**

**विविक्त देशे सुखासनस्थः ।**
**शुचिः समग्रीवशिरःशरीरः ।**
**एकाग्रचित्ते संयतइन्द्रियाणि ।**
**सद्भक्त्या स्वगुरुं प्रणम्य ।। ३ ।।**

श्रीसदाशिव म्हणाले... एकांत स्थानी स्वच्छ व पवित्र होऊन शरीर, मान, शिर एकाच सरळ रेषेत ठेवून सर्व इंद्रिये संयत करून एकाग्र चित्ताने श्रीगुरुंना सद्भक्ताने प्रणाम करावा. ।। ३ ।।

**स्वहृदये कमलमध्ये विरजं विशुद्धम् ।**
**ध्यायेत् निरंजनं दत्त–ॐकार–स्वरूपम् ।**
**ॐ द्रां ॐ इति मूल मन्त्रम् ।**
**जपेत् सदा मोक्षमार्गं च साधनम् ।। ४ ।।**

हे देवी ! स्वतःचे हृदयकमल शुद्ध, सात्त्विक करून त्यामध्ये ॐकारस्वरूप भगवान् दत्तात्रेयांचे ध्यान करावे व मनामध्ये 'ॐ द्रां ॐ' या मंत्राचा जप सतत करीत राहावे. हे मोक्षाचे साधन आहे. ।। ४ ।।

**अचिन्त्यं अव्यक्तं परब्रह्म स्वरूपम् ।**
**अनन्तं प्रशान्तं अमृतं ब्रह्मरूपम् ।**
**आदिमध्यान्तरहितं चिदानन्दरूपम् ।**
**सनातनं शाश्वतं ब्रह्मरूपम् ।। ५ ।।**

हे ईश्वरी ! भगवान् दत्त हे अनंत, प्रशांत, अमृत तत्त्व असे परब्रह्माचे रूप आहे. आदि, मध्य व अंतरहित असे हे परब्रह्माचे रूप सनातन आहे, शाश्वत आहे. ।। ५।।

**सः ब्रह्मा सः शिवः सः इन्द्रः ।**
**सः अक्षरं सः परमः विराटः ।**
**सः एव विष्णुः सः परमप्रकाशः ।**
**सः कालअग्नि सः ब्रह्माण्डरूपः ।। ६ ।।**

तेच ब्रह्मदेव आहेत, तेच विष्णु, तेच शिव व इन्द्रही आहेत, तेच विराट पुरुष आहेत, परमपुरुष आहेत व परमज्योतिही तेच आहेत. तेच कालपुरुष अग्नि असून समस्त ब्रह्माण्ड हे त्यांचेच स्वरूप आहे. ।। ६ ।।

**दिव्यो अमूर्तः श्रीदत्तः ।**
**सबाह्यान्तरव्यापकः ।**
**अप्राणोऽमनः विशुद्धः ।**
**महाशून्यः परतः परः ।। ७ ।।**

श्रीदत्त हे तत्त्व दिव्य आहे, अमूर्त आहे व अंतर्बाह्य व्यापून आहे. ते मन, प्राणाच्याही पलीकडे अत्यंत विशुद्ध व महाशून्याच्या पलीकडील सनातन असे चिरंतन तत्त्व आहे. ।। ७ ।।

**एतस्माज्जायते प्राणो ।**
**मनः सर्वइन्द्रियाणिच ।**
**खं वायुः ज्योतिःआपः ।**
**पृथ्वी विश्वस्यधारिणी ।। ८ ।।**

या श्रीदत्त महत् तत्त्वापासून प्राण, मन, इन्द्रिये, आकाश, वायु, ज्योति, पृथ्वी, आप हे सारे विश्व निर्माण झाले. ।। ८ ।।

**दत्तात्रेयं दिगम्बरं ।**
**सर्वस्य हृदि संस्थितम् ।**
**सर्वव्यापिनं ॐकारं ।**
**नित्यं ध्यायेत् च सर्वदा ।। ९ ।।**

हे देवी ! हा सर्वेश्वर सर्वांच्या हृदयात राहतो. हाच सर्वव्यापी ॐकार आहे. याचे सतत ध्यान करावे. ।। ९ ।।

**देवो दत्तः परब्रह्म ।**
**प्रणवश्च परमम् स्मृतः ।**
**अपूर्वानन्तः अन्तर्बाह्य ।**
**नित्यं ध्यायन्ति योगिनः ।। १० ।।**

अपूर्व, अनंत, अंतर्बाह्य व्यापून असणाऱ्या श्रीदत्त परब्रह्माचे योगी नित्य ध्यान करतात. हे परब्रह्म ॐकाराच्याही पलीकडील आहे. ।। १० ।।

**परब्रह्म दत्त सर्वलोकेषु गूढः ।**
**सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा ।**
**कर्माध्यक्षा सर्वभूताधिवासः ।**
**साक्षी चेता केवलो निर्गुणात्मा ।। ११ ।।**

श्रीदत्त परब्रह्म अत्यंत गूढ आहे. ते सर्वव्यापी असून सर्व प्राणीमात्रांचा अंतरात्मा आहे. ते सर्व कर्माचे अधिपति असून तेच सर्व भूतांमध्ये पूर्ण भरलेले आहे. ते सर्व पाहतात.

प्रेरणा देतात. जडजीवांना चेतना देणारे ते निर्गुणात्मा आहेत. ।। ११ ।।

**स्वदेहं अरणिंकृत्वा ।**
**श्रीदत्त उत्तरारणिं ।**
**चिन्तनं मन्थनाभ्यासे ।**
**पाशं दहति पण्डितः ।। १२ ।।**

हे देवी ! स्वतःच्या देहाला अरणी समजून 'ॐ नमो भगवते दत्तात्रेयाय' या मंत्राला उत्तर अरणी समजून सतत चिंतनरूपी मंथनाने विद्वान् लोक सर्व पाशातून मुक्त होतात. ।। १२ ।।

**।। इति श्रीदत्तगीता तृतीयोऽध्यायः ।।**

# ।। चतुर्थोऽध्यायः ।।

**श्रीसदाशिव उवाच –**

**तपसा प्राप्यते सत्त्वं ।**
**सत्त्वात् सम्प्राप्यते मनः ।**
**मनसा प्राप्यते श्रीदत्तं ।**
**संसारादि विमोचकः ।। १ ।।**

श्रीसदाशिव म्हणाले... तपाद्वारे बुद्धि स्थिर होते. बुद्धि स्थिर झाल्यावर मनावर ताबा प्राप्त होतो, मन ताब्यात आले की, ईश्वरप्राप्ती होते व जन्ममरणरूपी संसारचक्रातून सुटका होते. ।। १ ।।

**यथा निरिन्धनो वह्निः ।**
**स्वयमेवोपशाम्यति ।**
**तथा वृत्तिक्षयच्चित्तं ।**
**स्वयमेवोपशाम्यति ।। २ ।।**

ज्याप्रमाणे इंधनाचा पुरवठा न झालेला अग्नि आपोआप शांत होतो. त्याप्रमाणे सर्व प्रवृत्तींचा क्षय झाल्यावर आपोआपच चित्त शांत होते. ।। २ ।।

**स्वयमेवोपशान्तस्य मनसः सत्यगामिनः ।**
**इन्द्रियार्था विमूढस्यानृताः कर्मवशानुगाः ।। ३ ।।**

अशा प्रकारे हे देवी ! शांत झालेले चित्त आपोआपच सत्यमार्गी होते. मन, बुद्धि, चित्त सत्यानुगामी झाल्यावर इंद्रियांना विषय गोड लागत नाहीत. ।। ३ ।।

**चित्तं एवं संसार ।**
**स्ततः प्रयत्नेन शोधयेत् ।**
**यत् चित्तं तन्मयो भवति ।**
**गुह्यं एतत् सनातनम् ।। ४ ।।**

चित्त हेच संसार होय. याला अत्यंत प्रयत्नपूर्वक शुद्ध करावयास हवे. मग ते तन्मयच होते. हेच सनातन गुह्य आहे. ।। ४ ।।

**चित्तस्य हि प्रसादेन ।**
**हन्ति कर्मशुभाशुभम् ।**
**प्रसन्नात्मा श्रीदत्तगुरु:ध्यात्वा ।**
**सुखं अव्ययमश्नुते ।। ५ ।।**

चित्ताला प्रसन्नता लाभल्यावर सर्व शुभाशुभ कर्मे नष्ट होतात. अशा प्रसन्न चित्ताने भगवान् दत्तात्रेयांचे ध्यान केले असता अक्षय सुखाची प्राप्ति होते. ।। ५ ।।

**समासक्तं यदा चित्तं ।**
**संसार-विषय-गोचरे ।**
**यद्येवं श्रीगुरुं ध्यायेत् ।**
**को न मुच्यते बन्धनात्? ।। ६ ।।**

मनुष्याचे चित्त जितके संसारात गुरफटलेले आहे तितके जर भगवान् दत्तात्रेयांचे ध्यानांत गुरफटले तर कोण मुक्त होणार नाही? ।। ६ ।।

**लयविक्षेपरहितं ।**
**मनः कृत्वा सुनिश्चितम् ।**
**यदायात्य अमनोभावं ।**
**लभते श्रीगुरोःकृपाम् ।। ७ ।।**

लयविक्षेपरहित अशी मनाची अवस्था झाल्यावर अमनीभाव प्राप्त होतो आणि मग श्रीगुरुकृपा प्राप्त होते. ।। ७ ।।

**मन एव मनुष्याणां ।**
**कारणं बन्धमोक्षयोः ।**
**बन्धाय विषयासक्तं ।**
**मुक्त्यै निर्विषयं स्मृतम् ।। ८ ।।**

मन हेच मनुष्याच्या बंध, मोक्षाचे कारण आहे. विषयासक्त मन बंधनास कारण, तर निर्विषय मन, मोक्षास कारण आहे. ।। ८ ।।

**आत्मानं अरणिं कृत्वा ।**
**श्रीगुरुं उत्तरारणिम् ।**
**ध्यानं मन्थनाभ्यासात् ।**
**पश्येद् हृदयवासिनम् ।। ९ ।।**

स्वमनाची अरणी करून श्रीगुरुदत्त नाममंत्राला उत्तर अरणी करून सतत ध्यानाभ्यासाने हृदयातील ईश्वराला पाहावे. ।। ९ ।।

**सत्यं सत्यं महादेवि ।**
**धर्मज्ञे परमेश्वरि ।**
**विना दत्तोपासनेन ।**
**कलौ नास्ति गतिः प्रिये ।। १० ।।**

हे महादेवी ! तू धर्मज्ञ आहेस. या कलीयुगात श्रीदत्त उपासनेशिवाय जीवाला गति प्राप्त होत नाही. हे माझे सत्य वचन आहे. ।। १० ।।

**।। इति श्रीदत्तगीता चतुर्थोऽध्यायः ।।**

## ।। पञ्चमोऽध्यायः ।।

**श्रीमहादेव उवाच –**

**सर्व वेदपुराणैश्च ।**
**स्मृतिभिः संहितादिभिः ।**
**प्रतिपादितं नान्योऽस्ति ।**
**प्रभुः श्रीदत्तगुरुंविना ।। १ ।।**

श्रीमहादेव म्हणाले... सर्व वेद, पुराणे, उपनिषदे, संहिता, शास्त्रे एकमुखाने प्रतिपादन करतात की, या विश्वामध्ये श्रीदत्तगुरुंशिवाय या विश्वाचा अन्य प्रभू कोणीही नाही. ।। १ ।।

**दत्तात्रेय परब्रह्म ।**
**अनन्तं पुरुषोत्तमम् ।**
**पूजनात् पुरुषः नित्यं ।**
**सर्व दुःखातिगो भवेत् ।। २ ।।**

भगवान् दत्तात्रेय साक्षात् परब्रह्म आहेत. आदिअंतरहित पुरुषोत्तम आहेत. त्यांच्या चिंतनाने सर्व दुःखांचा नाश होतो. ।।२।।

**परमं पूज्यं परब्रह्म ।**
**परमं यत् महत् तपः ।**
**परमं महत् परब्रह्म ।**
**परमं कल्याणकारिणे ।। ३ ।।**

श्रीदत्त शून्य-महाशून्याच्या पलीकडील महत् असे परब्रह्मतत्त्व असून ते परमकल्याणकारी आहे. ।। ३ ।।

**यानि देवतानि गौणानि ।**
**श्रीदत्त परमोत्तमम् ।**
**बिन्दु-सिन्धु समानेन ।**
**गुरुदत्तः करुणानिधिः ।। ४ ।।**

हे देवी ! बिन्दु व सिन्धु यामध्ये कधी तुलना करता येईल का? त्याचप्रमाणे श्रीदत्त व इतर देव-देवता यांच्यामध्ये तुलना करता येणार नाही. इतर देवता या बिन्दुसमान असून करुणासागर भगवान् दत्तात्रेय हे सिन्धुसमान आहेत. ।। ४ ।।

**पाञ्चालिका यथा भित्तौ ।**
**सर्वेन्द्रिय समन्विताः ।**
**अमूरशक्ताः कार्येषु तथा ।**
**अन्याः च देवताः ।। ५ ।।**

ज्याप्रमाणे भिंतीवर कोरलेले एखादे सुंदर चित्र सर्व अवयवांनी युक्त असूनही कोणतेच कार्य करू शकत नाही, त्याप्रमाणे इतर देवता आहेत. त्या श्रीदत्तात्रेय या चेतनतत्त्वाच्या आश्रयाने राहतात व म्हणूनच त्या छोटी-मोठी कार्ये करू शकतात. ।। ५ ।।

**ब्रह्मा विष्णुश्च रुद्रश्च ।**
**सर्वाश्च देव-देवताः ।**
**तिष्ठन्ति श्रीगुरोऽपादं ।**
**करुणां कुरु याचिताः ।। ६ ।।**

ब्रह्मा, विष्णु, रुद्र आणि सर्व देव-देवता भगवान् दत्तात्रेयांच्या चरणकमलाजवळ सदैव करुणेची याचना करीत तिष्ठत असतात. ।। ६ ।।

**देवा नानाविधाः प्रोक्ता ।**
**देव्योपि बहुधाप्रिये ।**
**प्रीतो आराधितो देव ।**
**श्रीगुरुः परमेश्वरः ।। ७ ।।**

असंख्य देव-देवता अत्यंत प्रेमाने श्रीदत्तगुरु परमेश्वराची आराधना करतात. ।। ७ ।।

**यतो जगन्मङ्गलाय ।**
**त्वयाहं विनियोजितः ।**
**अतस्ते कथयिष्यामि ।**
**यद्विश्वहित कृतं भवेत् ।। ८ ।।**

हे देवी ! ज्याअर्थी तू जगत्कल्याणाकरिता मला प्रश्न विचारले आहेस, त्याअर्थी ज्याने संपूर्ण जगाचे कल्याण होईल असेच मी तुला सांगत आहे. ।। ८ ।।

**कृते विश्वहिते देवि ।**
**विश्वेशः परमेश्वरि ।**
**प्रीतो भवति श्रीदत्तोयतो**
**विश्वं तदाश्रितम् ।। ९ ।।**

हे देवी ! हे परमेश्वरी ! जगाचे कल्याण झाल्याने श्रीदत्त भगवान् संतुष्ट होतात. कारण ते विश्वाचे आत्मा आहेत आणि संपूर्ण विश्व त्यांच्या आश्रयाने राहत आहे. ।। ९ ।।

**श्रीदत्तगुरुः परब्रह्म ।**
**सत्यं अद्वैत परात्परः ।**
**स्वयंप्रकाशः सम्पूर्णः।**
**सच्चिदानंद लक्षणः ।। १० ।।**

भगवान् दत्तात्रेय परब्रह्म आहेत. तेच सत्य आहेत. अद्वैत आहेत. ब्रह्मादि देवतांपेक्षाही ते परात्पर आहेत. त्यांना सूर्य, चंद्राच्या प्रकाशाची आवश्यकता नाही. ते सतत पूर्ण आणि सच्चिदानंद आहेत. ।। १० ।।

**श्रीदत्तः सर्वभूतेषु ।**
**सर्वव्यापी सनातनः ।**
**सर्वेन्द्रियगुणाभासः ।**
**सर्वेन्द्रियविवर्जितः ।। ११ ।।**

श्रीदत्त भगवान् सर्व प्राणीमात्रांमध्ये विराजमान आहेत. ते सर्वव्यापी आणि सनातन आहेत. त्यांच्या चेतन शक्तीमुळे सर्व इंद्रिये प्रकाशित होतात परंतु ते इंद्रिये किंवा स्थूल विषय नव्हेत. ।। ११ ।।

**लोकातीतो लोकहेतुः ।**
**विश्वकल्याणकारणः ।**
**तदाधीनं जगत् सर्वं ।**
**त्रैलोक्यं सचराचरम् ।। १२ ।।**

श्रीदत्त भगवान् लोकातीत आहेत. केवळ लोककल्याण, विश्वकल्याणाच्या हेतूने ते भूतलावर संचार करतात. त्यांच्या अधीन हे सर्व विश्व व त्रैलोक्य आहे. ।।१२।।

**।। इति श्रीदत्तगीता पञ्चमोऽध्यायः ।।**

## ।। षष्ठोऽध्यायः ।।

**श्रीशिव उवाच–**

**ॐ निर्गुणं परमेश्वरं ।**
**सर्वस्य हृदि संस्थितम् ।**
**सर्व व्यापकं तत्त्वं ।**
**ज्ञाते द्वैतं न विद्यते ।। १ ।।**

श्रीशिव म्हणाले... निर्गुण परमेश्वर सर्व प्राणीमात्रांच्या हृदयांत विराजमान आहे. सर्व व्यापक असे ते अत्यंत सूक्ष्मतत्त्व आहे. असे ज्ञान झाल्यावर द्वैत शिल्लक राहत नाही. ।। १ ।।

**परमात्मा परब्रह्म ।**
**प्रणवातीतं परमं स्मृतः ।**
**योगी ज्ञात्वा महादेवि ।**
**ब्रह्मसायुज्यमश्नुते ।। २ ।।**

हे देवी ! परब्रह्म तत्त्व ॐकाराहून सूक्ष्म असलेले परम सूक्ष्म

तत्त्व आहे. ज्या योग्यांना या तत्त्वाचे ज्ञान होते ते ब्रह्मसायुज्यता प्राप्त करतात. ।। २ ।।

**तेजोबिन्दुपरं ध्यानं ।**
**विश्वातीतं हृदि स्थितम् ।**
**ॐ द्रां ॐ मन्त्रेण ।**
**लभते शाम्भवं पदम् ।।३।।**

प्रथम 'ॐ द्रां ॐ' 'ॐ नमो भगवते दत्तात्रेयाय' 'श्रीदत्त जय दत्त' यापैकी कोणत्याही एका मंत्राचा जप करावा. यात हळू हळू चित्त जसे लीन होत जाईल, तसा निळसर रंगाचा एक तेजोबिन्दू दिसू लागेल. या तेजोबिन्दूवर मन एकाग्र करून ध्यान करावे. हे ध्यान सिद्ध झाले असता शाम्भव पदाची म्हणजे सिद्धावस्थेची प्राप्ती होते. ।। ३ ।।

**ब्रह्म परतरं शुद्धं**
**व्यापकं निर्मलं शिवम् ।**
**देवदत्तपरब्रह्म ।**
**ज्योतिषां उदयो यतः ।।४।।**

ब्रह्माच्याही पलीकडे अत्यंत शुद्ध, व्यापक, निर्मळ व कल्याणकारी मंगलमय असे श्रीदत्त परब्रह्माचे स्थान आहे. या परब्रह्मापासून सर्व ज्योतिंचा म्हणजे सूर्य, चंद्र, तारका, अग्नि इत्यादींचा उदय होतो. ।। ४ ।।

**अतीन्द्रियं गुणातीतं ।**
**मनोलीनं यदा भवेत् ।**
**अनुपमं शिवं शान्तं ।**
**योगयुक्तं तदा विशेत् ।। ५ ।।**

जेव्हा मनोलय होतो, तेव्हा अतीन्द्रिय, गुणातीत, अत्यंत सुंदर, कल्याणमय अशी पराशांति प्राप्त होते. ।। ५ ।।

**श्रीदत्त नामानुसंधानं ।**
**नादो ज्योतिर्मयः शिवः ।**
**स्वयमेव विभं जगदात्मा ।**
**मेघा सूर्योदयं यथा ।। ६ ।।**

श्रीदत्त नाममंत्राचे सतत अनुसंधान ठेवल्यानंतर प्रथम (आपल्या) कानामध्ये विविध प्रकारचे नाद ऐकू येतात. नंतर ज्योर्तिमय

शिवाचे दर्शन होते. तद्नंतर ज्याप्रमाणे मेघांनी आच्छादिलेला सूर्य, मेघ निघून जाताच आपोआप प्रकाशमान होतो, तद्वत् अज्ञानाचे आवरण निघून जाते व परमात्मा स्वतः प्रकट होतो. ।। ६ ।।

**नि:शब्दं परब्रह्म ।**
**परमात्मा समीयते ।**
**दत्तनाम संलग्न–नादो ।**
**परं ज्योतिर्मयात्मकः ।। ७ ।।**

मंत्रजपाने जो नाद मनातल्या मनात निर्माण होतो, तो नादच सततच्या अभ्यासाने प्रकाशमान होऊन त्यातून दिव्य ज्योत निर्माण होते. नंतर नादाचा विलय होतो व त्या दिव्य ज्योतितून परमात्मा साकार होतो. ।। ७ ।।

**।। इति श्रीदत्तगीता षष्ठोऽध्यायः ।।**

# ।। सप्तमोऽध्यायः ।।

**ज्ञात्वा परब्रह्म सर्व पाशापहानिः ।**
**क्षीणे क्लेशे जन्म–मृत्यु प्रहाणि ।**
**तस्य आराधनेन जीवन्मुक्तिलाभः ।**
**सर्वैश्वर्ययुक्तं केवलं आत्मकामः ।। १ ।।**

भगवान् दत्तात्रेयांना जाणून घेतल्यावर सर्व पाशांचा नाश होतो व क्लेश निघून जातात. जन्ममृत्युरूपी संसारचक्रातून सुटका होते. त्या परमेश्वराचे निरंतर ध्यान केल्यावर पूर्ण तृप्त, सर्व ऐश्वर्यांनी युक्त कैवल्यरूप अशी सिद्धावस्था प्राप्त होते.।। १ ।।

**तिरुन्नतमं स्थाप्य समं शरीरम् ।**
**हृदि इन्द्रियाणि मनसा सन्निवेश्य ।**
**ब्रह्मोडूपेन प्रतरेत विद्वान् ।**
**स्त्रोतांसि सर्वाणि भयावहानि ।। २ ।।**

मस्तक, मान, छाती सरळ रेषेत ठेवून मनाने सर्व इंद्रियांना काबूत ठेवून परब्रह्माचे चिंतन करीत, या श्रीदत्तनामरूप नौकेने विद्वान् पुरुष भयावह अशा भवसागरातील सर्व जलप्रवाहांना पार करून जातो. ।। २ ।।

**श्रीदत्तः सर्वदिशा–प्रदिशाः ।**
**हिरण्यगर्भरूपः पूर्वोहं जातः ।**
**स एव जातः सजनिष्यमाणः ।**
**प्रत्यङ्ङ्जनास्तिष्ठति सर्वमुखः ।। ३ ।।**

भगवान् दत्तात्रेय सर्व दिशा, उपदिशांमध्ये प्रतिष्ठित आहेत. तेच हिरण्यगर्भरूपाने प्रथम उत्पन्न झाले व या हिरण्यगर्भाच्या अंतरंगातही तेच आहेत. तेच सर्व सृष्टीत, जीवनमात्रांमध्ये प्रतिष्ठित आहेत. सर्व मुखे त्यांचीच आहेत. ।। ३ ।।

**श्रीदत्तो देवानां प्रभवो उद्भवश्च ।**
**विश्वाधिपो विष्णुः रुद्रो महर्षिः ।**
**हिरण्यगर्भं जनयामास पूर्वम् ।**
**नमो नमस्ते केवलं ब्रह्मरूपम् ।। ४ ।।**

हे देवी! भगवान् दत्तात्रेयांनी असंख्य देवतांना निर्माण केले.

ब्रह्मा, विष्णु, रुद्र व असंख्य महाऋषि निर्माण केले. त्यांना विश्वाचे अधिपति म्हणून वेगवेगळे अधिकार दिले. त्यांनीच प्रथम हिरण्यगर्भ निर्माण केले. त्या अत्यंत शुद्ध अशा भगवान् दत्तात्रेयांना,परमेश्वराला मी प्रणाम करतो,नमस्कार करतो. ।।४।।

**जगद्‌गुरु विश्वकर्ता महात्मा ।**
**सदा संस्थितः हृदये जनानाम् ।**
**हृदा मनीषः मनसाभिक्लृप्तो ।**
**य एतद् विदुर् अमृतास्ते भवन्ति ।। ५।।**

जगद्‌गुरु दत्तात्रेय संपूर्ण विश्वाचा कर्ता असून सर्व मनुष्यांच्या हृदयात राहतात. त्यांना जाणून घेण्याची युक्ति म्हणजे त्यांना हृदय अर्पण करणे. त्यांना जे आपले हृदय अर्पण करतात, ते अमर होतात. ।। ५ ।।

**स्तोत्रं श्रृणु महेशानि ।**
**श्रीदत्त परमात्मनः ।**
**यद् श्रुत्वा साधको देवी ।**
**ब्रह्मसायुज्य लभ्यते ।। ६ ।।**

हे महादेवी! भगवान् दत्तात्रेयांचे स्तोत्र आता मी वर्णन करतो ते ऐक! हे स्तोत्र ऐकल्याने ब्रह्मसायुज्यता प्राप्त होते. ।। ६ ।।

**ॐ नमस्ते श्रीगुरु सर्व लोकाश्रयाय ।**
**नमस्ते सद्‌गुरुविश्वरूपात्मकाय ।**
**नमो अद्वैततत्त्वाय मुक्तिप्रदाय ।**
**नमो सद्‌गुरुब्रह्मणे निर्गुणाय ।। ७ ।।**

सर्व ब्रह्माण्डाला आश्रय देणाऱ्या हे श्रीगुरु सर्वेश्वरा ! तुला मी नमस्कार करीत आहे. तूच हे सर्व विश्व आहेस. तू अद्वैत आहेस, मुक्तिदाता आहेस, तुला माझे नमस्कार. हे सद्‌गुरु तू निर्गुण आहेस, परब्रह्म आहेस, तुला माझे नमस्कार. ।। ७ ।।

**त्वमेकं शरण्यं त्वमेकं वरेण्यम् ।**
**त्वमेकं जगत् कारणं विश्वरूपम् ।**
**त्वमेकं जगत् कर्तृपाताप्रहर्ता ।**
**त्वमेकं परं निश्चलं निर्विकल्पम् ।। ८ ।।**

शरण जाण्यास तू एकमेव स्थान आहेस. आराधना करण्यास तू एकमेव आराध्य आहेस. तू या समस्त विश्वाचा उत्पत्तिकर्ता

आहेस, पालनकर्ता आहेस व संहारकर्ता आहेस. तू सर्व कल्पनांच्या अतीत आहेस. तू अचल निर्विकल्प, महत् पुरुषोत्तम आहेस. ।। ८ ।।

**त्वं ईश्वराणां परमं महेश्वरम् ।**
**त्वं देवतानां परमं च दैवतम् ।**
**परेशं प्रभो सर्व विश्वः प्रकाशी ।**
**भवाम्भोधिपोतं शरण्यं व्रजामः ।। ९ ।।**

हे भगवान् दत्तात्रेया ! तू ईश्वराचाही परम महेश्वर आहेस. तू देवतांचा परम महादेव आहेस. तुझ्या परम प्रकाशामुळे हे सारे विश्व प्रकाशमान झालेले आहे. भवसागरातून पार होण्यासाठी तू एक महान जलपोत आहेस. म्हणून मी तुलाच शरण येत आहे. ।।९।।

**यस्य देवे पराभक्ति ।**
**र्यथा देवे तथा गुरौ ।**
**तस्यै ते कथिता देवि ।**
**प्रकाशन्ते महात्मनः ।। १० ।।**

हे देवी! ज्याची परमेश्वरावर अत्यंत भक्ति आहे आणि जशी परमेश्वरावर तशीच श्रीगुरुंवरही भक्ति आहे अशाच महात्म्याला ही गीता सांगावी, इतरांना सांगू नये. ।। १० ।।

**इति ते कथितं देवि ।**
**दत्तगीता महेश्वरि ।**
**पठनात् श्रवणात् देवि ।**
**ब्रह्मज्ञोजायते ध्रुवम् ।। ११ ।।**

हे देवी ! अशा प्रकारे मी तुला ही दत्तगीता सांगितली. हिच्या श्रवण व पठणाने नि:संशय ब्रह्म [illegible]

**।। इति श्रीदत्तगीता सप्तमोऽध्यायः ।।**

**।। इति श्री दत्तगीता संपूर्ण ।।**

**।। समाप्त ।।**

सर्व येथे राहणार ।
काही न येई बरोबर ।
सत्कर्म आणि सदाचार ।
हेचि जीवाचे सांगाती ।।

**- स्वामी दत्तावधूत**

# जीवनाची दिशा बदलणारे स्वामी दत्तावधूतांचे अमूल्य ग्रंथ

- **अगम्य वाणी (जागतिक भविष्य)** : सन १९९८ ते ३०००
- **आत्मसिद्धी**
- **भारतीय गूढविद्या :** गूढविद्येविषयी दुर्मिळ माहिती देणारा संग्राह्य ग्रंथ. या ग्रंथात अनेक साधना कशा कराव्यात याची माहिती दिलेली आहे. याशिवाय योगातील रहस्यमय भाग प्रथमच प्रकाशित करण्यात आला आहे.
- **मानवी जीवनातील गूढ रहस्ये (भाग १ ते ७)** : हे ग्रंथ वाचल्यानंतर मानवी जीवन हे गूढ शक्तींनी कसे भरलेले व भारलेले आहे याचे ज्ञान होते. अदृश्य सृष्टीची माहिती देणारे मराठीतील पहिलेच पुस्तक.
- **अमरत्वाकडे वाटचाल :**
  जीवनाची दिशा बदलणारी एका योग्याची ३० प्रवचने.
- **जीवन मुक्तीचा मार्ग** : ज्यांना खरोखर आध्यात्माची आवड आहे, ज्यांचे प्रारब्ध शुद्ध आहे, ज्यांचे मन स्वच्छ आहे, अशा लोकांना आध्यात्मात प्रगती करून देण्यास हे पुस्तक बरीच मदत करेल.
- **श्री दत्त - दुर्गा संवाद** : साधकांच्या मनातील शंभरहून अधिक प्रश्नांची उत्तरे देणारा ग्रंथ.
- **ईश्वरभक्तीचे अनुभव** : स्वामी दत्तावधूतांच्या पोथ्या व पुस्तके वाचून लोकांना आलेले अनुभव.
- **विहंगम मार्ग** : ईश्वर मानव कसा झाला व मानवाने पुनश्च ईश्वर होण्यासाठी काय करावे हे सांगणारा अनमोल ग्रंथ.

# श्री स्वामी दत्तावधूत यांचे प्रासादिक ओवीबद्ध ग्रंथ

- **श्रीदुर्गा सप्तशती**:- मूळ संस्कृत ग्रंथाचे प्राकृत ओवीबद्ध रूपांतर.
- **श्रीदत्तलीलामृत** :- श्री दत्तांच्या अनेक अवतारांच्या कथा.
  **श्रीसिद्धलीलामृत** :- हिमालयातील सिद्धयोग्यांच्या कथा
- **संक्षिप्त श्रीगुरुचरित्र** :– श्रीगुरुचरित्राइतकेच प्रासादिक व स्त्रियांनाही वाचता येईल असा ग्रंथ
- **श्रीस्वामी समर्थ सप्तशती** :– श्रीस्वामींच्या जीवनावर आधारित ओवीबद्ध ग्रंथ
- **श्रीदत्तगीता** :– श्रीदत्त देवाची महती सांगणारा ग्रंथ.
- **श्रीदुर्गा त्रिशती** :– देवीसूक्त, नारायणीस्तुती व श्री दुर्गास्तुतीसह

**ॐ वनिता बुक्स**
बी २१३, सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था
(पानवाला चाळ), डॉ. एस. एस. राव मार्ग, लालबाग,
मुंबई – ४०० ०१२. दूरध्वनी – ०२२–२४१८७३३९.